परिपत्रक

क्र.सकआ/शिक्षण/भासशि/दुरस्थशिक्षण/का-४/२०१३ |२८५६
समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे.१
दिनांक२६/९/२०१३.

प्रति,
सहाय्यक आयुक्त
समाज कल्याण (सर्व)

**विषयः-दुरस्थ शिक्षण(डिस्टन्स एज्युकेशन) अभ्यासक्रमांतील प्रवेशित अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीचा लाभ देण्याबाबत.**

संदर्भः- आयुक्तालयाकडील पत्र क्र.सकआ/शिक्षण/भासशि/दुरस्थशिक्षण/१२.१३/का-४/६१३, दि.१/३/२०१३.

दुरस्थ शिक्षण घेणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार शिष्यवृत्तीचा लाभ देण्याबाबत शासन स्तर व आयुक्तालय स्तरावर मार्गदर्शनपर सूचना वेळोवेळी निर्गमित केलेल्या आहेत तथापी बहुतांशी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचेमार्फत दिलेल्या सूचनांचे पालन न करता याबाबत आयुक्तालयाकडे अनावश्यक पत्रव्यवहार केल्याचे निदर्शनास आलेले आहे. याअभ्यासक्रमासाठी भारत सरकार शिष्यवृती देण्याबाबत संदर्भांकित दि.१/३/२०१३ नुसार परिपत्रक निर्गमित केलेले आहे.

दुरस्थ शिक्षण(**डिस्टन्स एज्युकेशन**) अभ्यासक्रमासाठी अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती मंजूर करतांना खालील मुद्दे विचारात घेवून शिष्यवृत्ती मंजूर करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

- १)दुरस्थ शिक्षण परिषद नवी दिल्ली भारत सरकार यांचेकडील मान्यताप्राप्त विद्यापीठ/संस्था यांनी ज्या अभ्यासकेंद्राना मान्यता दिलेली आहे अशा केंद्राकडून अभ्यासक्रमाची व विद्यार्थ्यांची (कायम नोंदणी क्रमांकासहीत) प्रमाणित केलेली यादी घेण्यात यावी.
- २)संस्थानी मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमास संबंधित विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला किंवा कसे याची खात्री करुनच सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांनी शिष्यवृती मंजूर करण्याची कार्यवाही करावी.
- ३)संबंधित संस्थाकडून शैक्षणिक वर्षाअखेरीस त्यांनी प्रमाणित केलेल्या व प्रत्यक्ष प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा परिक्षेचा अहवाल प्राप्त करुन घ्यावा जेणेकरुन भारत सरकार शिष्यवृत्तीचा लाभ पात्र विद्यार्थ्यांना दिला जाईल याची दक्षता घ्यावी.

मा. संचालक, वि.से.वि.
दिनांक १५/१०/२०१३ रोजी मा. कुलसचिवांच्या दालनात झालेल्या चर्चेनुसार विधार्थीसेवा संकेतस्थळावर सदर पत्र टाकण्यास मान्यता असावी ही विनंती.

आयुक्त, समाज कल्याण
महाराष्ट्र राज्य पुणे.१
२८/९/१३

प्रतिलीपी- मा.सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय मुंबई -३२ यांना माहितीस्तव सादर
प्रत-१) प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग (सर्व)
२)कुलसचिव,इंदिरागांधी राष्ट्रीय मुक्त विश्वविद्यालय नवी दिल्ली.
३) कुलसचिव,यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
४) कुलसचिव,राष्ट्रभाषा प्रचार समिती ज्ञान मंडळ वर्धा.

Director, SSD

उपकुलसचिव (शैक्षणिक)
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

कुलसचिव कार्यालय
आवक क्र.: 3937